# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन (नगरभवन) भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१ , दुरध्वनी - २८१८४५५३

जा.क्र.मनपा/उद्यान/ 485 /2024-25 दिनांक :- 01-10-2024

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय:- संकेतस्थळावर जाहीर आवाहन प्रसिध्द करणेबाबत.**

उपरोक्त विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील झाडांना खिळे ठोकणे, झाडांवर बॅनर, पोस्टर्स / भिंतीपत्रके व जाहीरात लावणे, झाडांवर आकर्षक विद्युत रोषणाई करणे व विद्रुपीकरणास प्रतिबंध करणेबाबतची सोबत जोडलेले जाहीर आवाहन मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

**सोबत :- जाहीर आवाहन प्रत.**

(कल्पिता पिंपळे)
उप. आयुक्त (उद्यान)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

## जाहीर आवाहन

**झाडांना खिळे ठोकणे, झाडांवर बॅनर, पोस्टर्स / भिंत्तीपत्रके व जाहिरात लावणे, झाडांवर आकर्षक विद्युत रोषणाई करणे व विद्रुपीकरणास प्रतिबंध करणेबाबत**

**संदर्भ :- जा.क्र.मनपा/मावज/ई-१८३५३१०/२०२४-२५ दि. १९/०४/२०२४ रोजीचे जाहिर आवाहन**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आलेली आहे. काही व्यावसायिक हे त्यांच्या व्यवसायांची जाहिरात व्हावी तसेच नागरीक नवरात्री व दिपावली या सणा दरम्यान प्रसिध्दी करण्याच्या हेतुने मुख्यत्वे रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडांना खिळे ठोकुन जाहिराती लावणे, बॅनर लावणे, पोस्टर, भिंत्तीपत्रके, इ. द्वारे जाहिराती चिकटवणे तसेच मुख्य रस्त्यावरिल झाडांवर आकर्षक विद्युत रोषणाई करणे अशा प्रकारची कृती करत असतात. यांमुळे झाडांना इजा पोहचत असुन झाडांवरील सजीवांवर त्याचा दृष्परिमाण होत आहे. तसेच शहराच्या सौंदर्यास बाधा पोहचून शहराचे विद्रुपीकरण होत आहे व पर्यावरणास हानी पोहचत आहे.

तरी सर्व संबंधिताना जाहिर आवाहन करण्यात येत आहे की, ते झाडांना खिळे ठोकुन जाहिराती लावणे, बॅनर लावणे, पोस्टर, भिंत्तीपत्रके, इ. द्वारे जाहिराती चिकटवणे तसेच मुख्य रस्त्यावरिल झाडांवर आकर्षक विद्युत रोषणाई करीत असल्यास हे जाहीर आवाहन प्रसिध्द झाले पासून २४ तासाच्या आत काढुन घ्यावे. तदनंतर जाहीराती, बॅनर, पोस्टर, भिंत्तीपत्रके व झाडांवर विद्युत रोषणाई करणा-या संबंधितावर महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ तसेच महाराष्ट्र मालमत्तेच्या विरुपणास प्रतिबंध करण्याकरिता अधिनियम १९९५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात येईल, तसेच याबाबत मा. राष्ट्रीय हरित लवादाने व मा. उच्च न्यायालयाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, यांची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

**(कल्पिता पिंपळे)**
**उप. आयुक्त (उद्यान)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

Scanned with OKEN Scanner